# १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम

कार्यालय:- जिल्हा उद्योग केंद्र, जालना

# क्षेत्रीय कार्यालयांसाठी शंभर दिवसांच्या कृती आराखडा नुसार कार्यवाही करावयाचे मुद्दे

- संकेतस्थळ
- सुकर जीवनमान
- स्वच्छता
- जनतेच्या तक्रारींचे निवारण
- कार्यालयातील सोयी व सुविधा
- गुंतवणुकीस प्रोत्साहन
- क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

# संकेतस्थळ

- वापरण्यातील सुलभता (User Friendly)


उद्योग संचालनालयाचे di.maharashtra.gov.in संकेतस्थळ कार्यरत असून वापरण्यास सुलभ आहे. सदर संकेतस्थळावर गुंतवणूकदारांसाठी मार्गदर्शक धोरणे/ सुधारणा व उद्योग विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या सेवा आणि योजनांची माहिती उपलब्ध आहे.

- माहितीचे अद्ययावतीकरण (Updated Information)


सदर संकेतस्थळावर वेळोवेळी माहितीचे अद्यावतीकरण करण्यात येते. मैत्री २.० पोर्टलच्या संकेतस्थळावर जिल्ह्याचे औद्योगिक प्रोफाईल, जिल्हा निर्यात कृती आराखडा, जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकांचे इतिवृत्त तसेच निर्यात डॅशबोर्ड या टॅबवर अद्ययावत माहिती उपलब्ध आहे.


# संकेतस्थळ


महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री)
जिल्हा परिचय
Nanded


Maharashtra Industry, Trade And Investment Facilitation (MAITRI)
DISTRICT EXPORT ACTION PLAN

# संकेतस्थळ



# संकेतस्थळ

- माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण (Proactive disclosure under RTI Act)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१) क व ख नुसार जिल्हा उद्योग केंद्र या कार्यालयातील कार्ये व कर्तव्य यांचा तपशील जिल्हा प्रशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. Jalna_DIC Info under RTI

- सुरक्षितता (Data / Cyber Security)

संकेतस्थळ सुरक्षित आहे.

# संकेतस्थळ

- लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे.

उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या शासन निर्णय दि. २३.०७.२०१५ नुसार लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा अधिसूचित करून Notified Services या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या आहेत.

# सुकर जीवनमान (Ease of Living)

- नागरिक केंद्रित सेवांचे सुलभीकरण (किमान २ सेवा) (पूर्वीची स्थिती व सुलभीकरणानंतर झालेले बदल यांची तुलना आवश्यक)

**1. PMEGP**

PMEGP सेवा ऑनलाईन प्रणालीद्वारे PMEGP Portal सन 2015-16 पासून राबविली जात असल्याने नागरिकांना सुलभ रीतीने अर्ज करता येतो व अनुदानाचा लाभ मिळतो. सदर योजना पुर्वी ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत असल्याने अर्जदाराचा वेळ व अधिक श्रम घ्यावे लागत होते. परंतु सन २०१९ पासून सदर योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत असल्याने www अर्जदार लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे कार्यालयात सादर करावी लागत नसून सर्व प्रक्रीया ऑनलाईन पोर्टलद्वारेच राबविण्यात येत आहे.

# सुकर जीवनमान (Ease of Living)

**2. MAITRI Portal**

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 4 फेब्रुवारी 2025 रोजी सुरू केलेले महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा सेल (MAITRI) 2.0 पोर्टल आता पूर्णपणे कार्यान्वित झाले आहे. हे 15 विभागांमधील 119 सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकत्रित करते तसेच प्रशासकीय अडथळे कमी करून आणि रिअल-टाइम ॲप्लिकेशन ट्रॅकिंग सक्षम करून गुंतवणूक प्रक्रिया सुव्यवस्थित करते.

# स्वच्छता (Cleanliness)

- अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण

जिल्हा उद्योग केंद्र, जालनाचे जागी नवीन उद्योग भवन बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आल्याने मुख्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार हे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात मराठा भवन, विशाल कॉर्नर, जालना येथे स्थलांतरीत झाले असून अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण करण्यात आले आहे.







# स्वच्छता (Cleanliness)

- मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे

  सदर कार्यवाही चालू आहे.



# स्वच्छता (Cleanliness)

- जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण

  जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.

- जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट

  अद्याप नाही


- जुन्या वाहनांचे निर्लेखन

  कार्यालयातील दोन पैकी एका जुन्या वाहनाचे निर्लेखन केलेले असून दुसऱ्या वाहनाच्या निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे.

# तक्रार निवारण (Grievance Redressal)

- आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे निराकरण (दि. १ एप्रिल, २०२५ पर्यंत तक्रारी निरंक करणे) (टक्केवारीत %)

आपले सरकार पोर्टलवरील तक्रारीचे निराकरण केलेले आहे. (निरंक आहेत.)



# तक्रार निवारण (Grievance Redressal)

- पी.जी. पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण दि. १ एप्रिल, २०२५ पर्यंत तक्रारी निरंक करणे) (टक्केवारीत %)

  निराकरण केलेले आहे. (निरंक आहेत.)

- अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबाबत प्रसिध्दी



# तक्रार निवारण (Grievance Redressal)

- लोकशाही दिनाचे आयोजन व त्यामधील तक्रारींचे निराकरण

जिल्हाधिकारी कार्यालयात नियमित आयोजित होणाऱ्या लोकशाही दिनानिमित्त निरंक तक्रारी प्राप्त आहेत..

# कार्यालयातील सोयी व सुविधा
## (Amenities at work place)

- कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

  कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे.

- पुरुष कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा

  होय.

- महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा

  होय.

# कार्यालयातील सोयी व सुविधा
## (Amenities at work place)

- अभ्यागतासाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था

  होय.

- कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण

आवक/जावक कक्ष

लेखा शाखा

आस्थापना शाखा

PMEGP कक्ष

CMEGP कक्ष

# कार्यालयातील सोयी व सुविधा
## (Amenities at work place)

- कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण








# कार्यालयातील सोयी व सुविधा
## (Amenities at work place)

- कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण






# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field visits)

- आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे

कार्यालय केवळ जिल्हापातळीवर असल्याने जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी जिल्ह्यातील बँक शाखांना व विभागीय व्यवस्थापकांना महाव्यवस्थापक, व्यवस्थापक तसेच उद्योग निरीक्षक भेटी देतात.

- केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे

CMEGP योजनेच्या लाभार्थ्यांच्या मार्जिन मनी दाव्याच्या अनुषंगाने प्रकल्प स्थळ पाहणी व PMEGP योजनेच्या मार्जिन मनी समायोजनासाठी प्रकल्प स्थळ पाहणी तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना अंतर्गत सामायिक सुविधा केंद्रांना भेटी देण्यात येतात.

# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Field visits)

- क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्राम पंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत 'एक गाव एक उद्योजक' ही संकल्पना राबविण्यात येत असून सदर योजनेचा प्रचार व प्रसिद्धी ग्रामपंचायत व गावातील माध्यमिक शाळांमध्ये करण्यात येते.

- ग्राम स्तरावरील कर्मचाऱ्यांचे अनुभव, अडचणी व सूचना यांवर त्वरीत कार्यवाही करणे.

लागू नाही.

# ई-ऑफीस प्रणाली

- प्रशासकीय कामकाजात १ जानेवारी २०२५ पासून ई-ऑफीस प्रणालीचा वापर करणे

सदर विषयाच्या अंमलबजावणी संबंधी उद्योग संचालनालयाच्या पातळीवर कार्यवाही सुरू आहे.

- ई-ऑफीस प्रणालीत ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे

सदर विषयाच्या अंमलबजावणी संबंधी उद्योग संचालनालयाच्या पातळीवर कार्यवाही सुरू आहे.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे

केंद्र शासन व राज्य शासनाचे औद्योगिक धोरण व औद्योगिक विकासाच्या विविध योजना राबविण्याच्या दृष्टीने जिल्हा उद्योग केंद्र हे जिल्हा स्तरावरील एक महत्वाचे कार्यालय आहे. जिल्ह्यातील उद्योजकांना एकाच ठिकाणी उद्योग उभारणीबाबतची सर्व सेवा मिळण्यासाठी तसेच अनुषंगिक कामासाठीच्या सेवा उपलब्ध करुन दिल्यास केंद्र शासनाच्या EoDB धोरणांतर्गत व्यवसाय सुलभतेचे उद्दीष्ट पुर्ण होईल या उद्देशाने उद्योग संचालनालयाच्या अधिनस्त जालना येथील जिल्हा उद्योग केंद्र, ही इमारत पाडून त्या जागी "नवीन उद्योग भवन" बांधण्याचे काम सुरू आहे.

सदर उद्योग भवनात जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, क्षेत्र व्यवस्थापक एमआयडीसी व उपअभियंता एमआयडीसी ही कार्यालय सहभागी आहेत.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे

भारत सरकारच्या प्रत्येक जिल्हा हा निर्यात केंद्र या उपक्रमांतर्गत मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे निर्देशानुसार जिल्हा उद्योग केंद्र जालनाचे वतीने जिल्हास्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.29.01.2025 रोजी मा. जिल्हाधिकारी जालना यांचे मार्गदर्शन व अध्यक्षतेखाली महसूल भवन जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित केले होते. सदर कार्यशाळेत 117 उद्योजक उद्योजक निर्यात शेतकरी उत्पादक संघटना इत्यादी उपस्थित होते.

सदर कार्यशाळेत उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर विभाग, श्री. बी. टी. यशवंते यांनी महाराष्ट्र राज्य निर्यात धोरण अंतर्गत उद्योजकांना देय असणाऱ्या प्रोत्साहनांबाबत तसेच निर्यात धोरणाची थोडक्यात माहिती दिली. सदर कार्यशाळेत श्री. संदीप महाजन, इंडिया पोस्ट यांनी डाक निर्यात केंद्रबाबत, श्री. पांडुरंग बामणे सहाय्यक व्यवस्थापक, अपेडा यांनी कृषी आधारित उत्पादनांची निर्यात करण्यासंबंधी व श्री. अमोल मोहिते यांनी जालना जिल्ह्याच्या निर्यातीसंबंधी प्रेझेंटेशन सादर केले.

# Maharashtra Export Convention _ Jalna









# जिल्हा गुंतवणूक परिषद २०२५ _ जालना

जालना जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीच्या संधी, जिल्ह्यातील उत्पादने यांचे निर्यात वृद्धी तसेच औद्योगिक विकासाकरिता जिल्हा गुंतवणूक परिषद,जालना दि. ०७.०४.२०२५ रोजी DPDC Hall, Jalna येथे मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा गुंतवणूक परिषद कार्यकारी समिती यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली होती. सदर गुंतवणूक परिषदेमध्ये जालना जिल्ह्यातील ऑटोमोबाईल, फूड प्रोसेसिंग, स्टील तसेच इतर औद्योगिक क्षेत्रातील 47 सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठ्या व विशाल उद्योग घटकांसोबत 2079.67 कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले.

सदर गुंतवणूक परिषदेमार्फत सर्वसमावेशक वाढ आणि प्रादेशिक समृद्धीसाठी आर्थिक विकासास आधार म्हणून जिल्ह्याचे महत्त्व अधोरेखित होण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांनी प्रतिपादित केले. या गुंतवणूक परिषदेत मा. उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजी नगर विभाग श्री बी टी. यशवंते, मैत्री नोडल ऑफिसर श्री किशोर गिरोल्ला, EoDB team consultant श्री आकाश ढगे यांनी उद्योग विभागाशी संबंधित धोरणांविषयी व मैत्री पोर्टल बाबत मार्गदर्शन केले.

# जिल्हा गुंतवणूक परिषद २०२५ _ जालना









# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- व्यापारी / कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे

दि. २८.०२.२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जिल्हा सल्लागार समिती सभा, आजारी उद्योग पुर्नवसन समिती सभा, स्थानिक लोकांना रोजगार प्राधान्य समिती सभा घेण्यात आली होती. सभेत औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा होऊन संबंधित अधिकाऱ्यांनी विना विलंब प्रस्ताव सादर करण्याबाबत मा. अध्यक्षांनी सूचना दिल्या आहेत.

- गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे

मा. जिल्हाधिकारी, जालना यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती सभेत तसेच मैत्री पोर्टलवर प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येते.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- गुंतवणूकदार उद्योजकांसाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे

उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या दि. ०२.०७.२०१५ शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रांमध्ये कायदा व संस्था राखणे व औद्योगिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी राज्यातील ग्रामीण भागातील जिल्ह्यांमध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक व आयुक्तालय असलेल्या जिल्ह्यांमध्ये पोलीस आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

१. औद्योगिक क्षेत्राशी संबंधित उपविभागीय अधिकारी (महसूल) - सदस्य

२. महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र - सदस्य

३. जिल्हा कामगार अधिकारी - सदस्य

४. प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ - सदस्य सचिव

# अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे

लागु नाही.

- पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे

पदोन्नतीची कार्यवाही विभागीय कार्यालय व मुख्यालयामार्फत राबविण्यात येते. तसेच स्थानिक कर्मचा-याच्या तक्रारींचे विभागीय कार्यालय व मुख्यालयाशी पत्रव्यवहार करून नियमित निराकरण करण्यात येते.

- कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे

आस्थापनेवरील कर्मचारी व अधिकारी यांना Meta, Google Assistant, ChatGPT या ॲप्लिकेशनचा वापर करण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.


- कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे

अपुऱ्या मनुष्यबळामुळे कर्मचारी व अधिकारी स्मार्ट एप्लीकेशन चा वापर करत आहेत.

# नावीन्यपूर्ण उपक्रम

- ❑ कार्यालयामध्ये किमान २ नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे

1. Hyperlinking the Export Dashboard link on the District Administration portal under the “Quick Links” section of the portal






# नावीन्यपूर्ण उपक्रम

1. Hyperlinking the Export Dashboard link on the District Administration portal under the "Quick Links" section of the portal

Exports Dashboard: https://maitri.maharashtra.gov.in/exports-dashboard/

As part of the Ease of Doing Business (EoDB) initiative by the DPIIT, the Directorate of Industries is coordinating on with the implementation of reform points pertaining to Exports and ODOP for the state Maharashtra, following the Business Reform Action Plan (BRAP) 2024 guidelines.

In line with these reforms, DPIIT has directed state departments to ensure the development of an exports dashboard that captures exports data from each district.

# नावीन्यपूर्ण उपक्रम

## 2. QR Code आधारित महाराष्ट्र राज्य विविध धोरणे

जिल्हा उद्योग केंद्र जालना या कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे विविध धोरणे QR Code असणाऱ्या माहिती भित्तिपत्रकान्वये नवउद्योजक व अभ्यागतांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

